**गणेशोत्सव हा “राज्य महोत्सव” म्हणून घोषित असल्याने व तो सर्वव्यापक व्हावा म्हणून सर्व विभागांचा सहभाग घेवून विविध कार्यक्रम/ उपक्रम आयोजित करणे व त्या अनुषंगाने सर्व समावेशक सुचनांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र. ३३९(ई.क्र.१७८६०८८)/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६.

वाचा: १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. पुलदे-२०२५/प्र.क्र.७४ (ई. नं.११४४०९५)/सां.का.२, दि. २० जून, २०२५.
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. पुलदे-२०२५/प्र.क्र.११४ (ई. नं.१२५५४१२)/सां.का.२, दि. १४ ऑगस्ट, २०२५.
३. सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सांकासं/२४२०, दि. ३१ जुलै, २०२६.

**प्रस्तावना :-**

राज्याच्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक परंपरेत गणेशोत्सव हा अत्यंत लोकप्रिय आणि राज्याची देशविदेशात सांस्कृतिक ओळख निर्माण करून देणारा असा उत्सव आहे. गणेशोत्सव काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना चालना मिळत असून राज्यात एकूणच सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अभिसरण होते. त्यामुळे ही परंपरा व संस्कृती जपली जावी, वृद्धिंगत व्हावी, यासाठी गणेशोत्सव हा "राज्य महोत्सव" म्हणून साजरा करण्याची घोषणा मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी दि. १८ जुलै २०२५ रोजी राज्य विधिमंडळात केली आहे. त्यानुसार, उपर्निदिष्ट २ अन्वये, गणेशोत्सवाला “राज्य महोत्सवाचा” दर्जा देण्यात आला. त्यानुषंगाने, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत व सर्व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ जुलै, २०२६ रोजी सदर कार्यक्रम व उपक्रम यावर्षी आयोजित करण्यासाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत महाराष्ट्र राज्याचा राज्य महोत्सव- “गणेशोत्सव” युनेस्को संस्थेच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळविण्यासाठी गाव पातळीपासून ते शहरापर्यंत गणेशोत्सवानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम आयोजित करण्याबाबत निर्देश मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी दिले. त्यानुषंगाने, गणेशोत्सवानिमित्ताने मंत्रालयीन विभागाने आपल्या विषयाशी संबंधीत गणेशोत्सवानिमित्त उपक्रम राबविल्यास शासनाचा संदेश अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचू शकतो. सबब, मंत्रालयीन विभागांनी व त्यांच्या अधिनस्त कार्यालय, आस्थापना, महामंडळ इत्यादी यांच्यामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य महोत्सवांतर्गत मंत्रालयीन विभागांनी व त्यांच्या अधिनस्त कार्यालय, आस्थापना, महामंडळ इत्यादी यांच्यामार्फत खालील विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम आयोजित करण्यास या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात येत आहे:-

| विभाग | विभागाने करावयाची कार्यवाही/उपक्रम | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| **सांस्कृतिक कार्य विभाग** | **<u>पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी</u>**<br>• उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करणे. राज्यातील सुमारे ४८० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सुमारे १.५० कोटी रुपये इतक्या रकमेची पारितोषिके वितरित करणे.<br>• या स्पर्धांचे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांकरिता पारितोषिक वितरण समारंभ अकादमीतर्फे आयोजित करणे.<br>• गणेशोत्सवाच्या निमित्ताने राज्य व्याख्यानमालेचे आयोजन करणे.<br>• राज्यातील प्रमुख गणेश मंदिरे आणि सार्वजनिक गणेशोत्सव यांचे ऑनलाइन दर्शन करता यावे, याकरिता एक पोर्टल निर्माण करणे.<br>• घरगुती गणेशोत्सवाची छायाचित्रे अपलोड करता यावीत, याकरिता एक डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करणे.<br>• राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशभर व्हावी याकरिता वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, रेडिओ आणि समाजमाध्यमे यांच्या माध्यमातून देशभरात प्रचार व प्रसिध्दी करणे. | मागणी क्र. झेडडी-०२, २२०५, कला व संस्कृती, (१०१) ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७)(०१) पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (२२०५ १४६३) ५०-इतर खर्च |
| | **<u>सांस्कृतिक कार्य संचालनालय</u>**<br>• राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवास प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रमांचे स्थानिक संस्थांच्यासोबत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजन करणे.<br>• ३६ जिल्ह्यांमध्ये गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन<br>• महाराष्ट्र बाहेरील १० राज्यांत गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन<br>• भारताबाहेर १ देशात गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन<br>• नवी दिल्ली येथे गणेशोत्सवानिमित्त ५ दिवस सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन<br>• मुंबई येथे गणेशोत्सवानिमित्त ८ दिवस सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन. | मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती प्रचालन, (०२) राज्यनृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य कला संस्कृति जतन, संवर्धन विविध महोत्सव तसेच इतर कार्यक्रम (२२०५ १५०७) ५०-इतर खर्च (कार्यक्रम) |

| | | |
|---|---|---|
| | **<u>दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव</u>**<br>• दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव यांच्या माध्यमातून साजरा करण्यात येणाऱ्या गणेशोत्सवाला व्यापक स्वरुप यावे, या अनुषंगाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, उपक्रम हाती घेणे.<br>• गणेशोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यभरातून गणपती विषयक रिल्स स्पर्धा महसूल विभागीय व राज्यस्तरावर आयोजित करणे.<br>• ज्या मराठी चित्रपटांमधून गणेशोत्सवाशी संबंधित परंपरा व प्रथा यांचे उत्तम चित्रण करण्यात आले आहे, अशा चित्रपटाचा गौरव करणे. | दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव कार्यालयाच्या स्वनिधीतून |
| | **<u>सर्व जिल्हाधिकारी</u>**<br>• उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय समित्या गठित करणे, स्पर्धेसाठी अकादमीतर्फे पाठविण्यात आलेल्या अर्जाचे प्रत्यक्ष भेटीद्वारे समितीमार्फत परिक्षण करणे, गुणांकन करणे व अंतिम निकालपत्र अकादमीकडे पाठविणे.<br>• राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आल्यानंतर तालुका व जिल्हास्तरीय (द्वितीय व तृतीय) विजेत्यांसाठी पारितोषिक वितरण समारंभ संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत करणे.<br>• राज्य महोत्सवाच्या अनुषंगाने शहरांतील प्रमुख ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई, विसर्जन मिरवणुकांचे संयोजन व समन्वयन करणे.<br>• शासन निर्णयामध्ये नमूद उपक्रम, कार्यक्रम यांचे स्थानिक स्तरावर नियंत्रण, समन्वयन आणि प्रचार व प्रसिध्दी करणे. | संदर्भाधीन दिनांक २०.०६.२०२५ व दि.१४.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन गणेशोत्सव कार्यक्रम/उपक्रम यशस्वी करण्याची कार्यवाही करावी. तसेच गणेशोत्सव हा राज्य महोत्सव घोषित झाल्याने सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांका-२ मार्फत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचनांच्या अनुषंगानेही कार्यवाही करण्यात यावी. |
| **गृह विभाग** | गणेशोत्सव सुवव्यस्थितरित्या पार पाडण्यासाठी नियोजन करावे. | गणेशोत्सव हा राज्य महोत्सव घोषित झालेला असल्याने कार्यक्रम/ उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी कार्यवाही करावी. |
| **माहिती व जनसंपर्क** | • गणेशोत्सवाचा इतिहास, परंपरा, अष्टविनायक, पर्यावरणपूरक गणेशोत्सव व शासनाच्या उपक्रमांवर आधारित माहिती प्रसारीत करणे.<br>• माहितीपत्रके<br>• दृकश्राव्य माध्यमाचा वापर<br>• सोशल मीडिया जनजागृती मोहीम राबवावी. आवश्यकतेनुसार सदर उपक्रमाच्या अनुषंगाने उपक्रम राबविण्यात यावेत. | |
| **माहिती** | • गणेशोत्सवास राज्य महोत्सवाचा दर्जा असल्याने राज्य महोत्सवाचा लोगो शासनाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित | |

| | | |
|---|---|---|
| **तंत्रज्ञान** | करण्यात यावा. | |
| **कृषि** | • स्थानिक शेतकऱ्यांच्या सहभागातून दुर्वा, फुले, नैवेद्य साहित्य, सेंद्रिय कृषी उत्पादने व पारंपरिक कृषी संस्कृतीची माहिती प्रसारीत करावी. | |
| **सहकार** | • महिला बचतगट व सहकारी संस्थांना मोदक, प्रसाद साहित्य व स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी प्रोत्साहन द्यावे. | |
| **उद्योग** | • गणेश मूर्ती, मखर, सजावट व पूजासाहित्य तयार करणाऱ्या MSME उद्योग व कारागिरांसाठी प्रोत्साहन देणारे उपक्रम आयोजित करावेत. | |
| **वस्त्रोद्योग** | • पैठणी, खण, नऊवारी, फेटे व इतर पारंपरिक वस्त्रांची माहिती प्रसारीत करावी. | |
| **ऊर्जा** | • गणेश मंडळांना वीज जोडणीसाठी सुलभ प्रक्रीया राबवावी.<br>• पर्यावरणपूरक एलईडी (LED) दिव्यांच्या वापराला प्रोत्साहन देणे.<br>• ऊर्जा बचत करणारा गणेशोत्सव; LED सजावट, सौरऊर्जेवरील गणेश मंडप याबाबत जनजागृती करणे. | |
| **ग्रामविकास** | • ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त अशा उपक्रमातून गणेशोत्सव साजरा करणे.<br>• ग्रामीण पातळीपासून पर्यावरणपूरक विसर्जन उपक्रम राबवावेत. यासाठी कृत्रिम विसर्जन तलाव उभारणे. | |
| **मृदा व जलसंधारण** | • गणेश मुर्ती विसर्जनामुळे जलस्रोत आडणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• जलसंवर्धनाबाबत जनजागृती करावी. | |
| **आदिवासी विकास** | • आदिवासी कलाकारांच्या लोककला, हस्तकला माध्यमातून गणेशोत्सव साजरा करणे.<br>• आदिवासी कलेवर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनास प्रोत्साहन द्यावे. | |
| **कौशल्य विकास** | • युवकांसाठी शाडू मूर्ती, मखर, सजावट, डिजिटल डिझाइन वापर उद्योजकता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित कराव्यात. | |
| **पर्यावरण व वातावरणीय बदल** | • शाडू मूर्ती, बीज गणपती, निर्माल्य संकलन, पुनर्वापर व प्लास्टिकमुक्त गणेशोत्सवासाठी राज्यव्यापी जनजागृती मोहीम राबवावी. | |
| **गृहनिर्माण** | • गृहनिर्माण संकुलांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव, स्वच्छता स्पर्धा व सामुदायिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करावेत. | |

| | | |
|---|---|---|
| **नगर विकास विभाग** | • महानगरपालिका/नगरपालिकाच्या/नगरपंचायत यांच्या माध्यमातून नगरस्वच्छता, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त अशा उपक्रमातून गणेशोत्सव साजरा करणे.<br>• महानगरपालिका/नगरपालिकाच्या/नगरपंचायत पातळीपासून पर्यावरणपूरक विसर्जन उपक्रम राबवावेत. यासाठी कृत्रिम विसर्जन तलाव उभारणे. | |
| **महिला व बालविकास** | • गणेशोत्सवाच्या काळात विक्री चांगली होत असते याद्दष्टीने महिला बचतगटांच्या प्रदर्शनास प्रोत्साहन देणे.<br>• बालकांसाठी व महिलांसाठी गणेश संस्कार शिबिरे, मोदक स्पर्धा इ. कल्पक व नवीन उपक्रम घेण्यास सूचित करणे. | |
| **उच्च व तंत्र शिक्षण** | • महाविद्यालयांमध्ये "गणेश आणि विज्ञान" या विषयावर परिसंवाद<br>• व्याख्याने व नवोपक्रम प्रदर्शन आयोजित करण्यास प्रोत्साहन देणे.<br>• अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमार्फत मंडळांस नाविन्यपूर्ण रोबोटिक्स देखावे<br>• महाविद्यालयांमध्ये 'इको-फ्रेंडली डेकोरेशन' जनजागृती करणे. | |
| **मराठी भाषा** | • गणेशावरील काव्यवाचन, निबंध, वक्तृत्व, कथाकथन व सुलेखन यासाठी प्रोत्साहन देणे.<br>• विविध राज्यामध्ये व विविध देशांमध्ये असलेल्या मराठी मंडळांना गणेशोत्सवामध्ये सहभागी करुन घेणे. | |
| **शालेय शिक्षण** | • गणेशोत्सवापूर्वी शाळांमध्ये शाडूच्या मातीचे गणपती बनवण्याच्या कार्यशाळा आयोजन.<br>• शालेय विद्यार्थ्यांमध्ये गणेशोत्सवाच्या इतिहासावर आणि सामाजिक भान यावर आधारीत निबंध, वकृत्व व सांस्कृतिक उपक्रम. | |
| **क्रीडा** | • क्रिडा मंडळांना पर्यावरण पूरक गणेशोत्सव सादर करण्यासाठी प्रोत्साहन देणे. | |
| **सार्वजनिक आरोग्य** | • गर्दीच्या ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे आणि 'हार्ट-अटॅक' प्रथमोपचारासाठी सीपीआर (CPR) प्रशिक्षणास प्रोत्साहन देणे. | |
| **वैद्यकीय शिक्षण** | • वैद्यकीय मदत केंद्र व आरोग्य मार्गदर्शन यासाठी स्वयंसेवक पाठविणे. | |
| **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण** | • प्रसाद व खाद्यपदार्थांच्या अन्नसुरक्षेबाबत तपासणी, जनजागृती व भेसळ प्रतिबंध मोहिमा राबवाव्यात. | |

| | | |
|---|---|---|
| **नियोजन** | • जिल्हा नियोजन समितीमार्फत गणेशोत्सवानिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रमांना मदत करणे. | |
| **सार्वजनिक बांधकाम** | • विसर्जन मार्ग सुव्यवस्थित राहतील याची दक्षता घेणे.<br>• शासकीय इमारती व इतर महत्वाच्या जागी प्रकाशयोजना करणे.<br>• पोलीस प्रशासनाच्या समन्वयाने दिशादर्शक फलक, बॅरिकेडिंग व सुरक्षित पादचारी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. | |
| **दिव्यांग कल्याण** | • दिव्यांगांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, सांकेतिक भाषेतील आरती, स्पर्शदर्शन सुविधा व सुलभ प्रवेशाची व्यवस्थेसाठी प्रोत्साहन देणे व दिव्यांगाच्या योजनेबाबत जनजागृती करणे. | |
| **पर्यटन विभाग** | • राज्य गणेशोत्सवाच्या अनुषंगाने देशी व विदेशी पर्यटकानां राज्य गणेशोत्सवाची माहिती होण्यासाठी योग्य ते उपक्रम करावेत. | |

०२. राज्य महोत्सवांतर्गत गतवर्षीप्रमाणे संपन्न झालेल्या विविध स्पर्धासाठी समन्वयक म्हणून "संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र राज्य कला अकादमी, मुंबई" हे कामकाज पहातील, तर विविध मंत्रालयीन विभाग/ कार्यालयामार्फत आयोजित होणारे सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम यांचे समन्वय ठेवण्यासाठी "संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय" यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

०३. उपरोक्त नमुद तक्त्यांमधील कार्यक्रम/उपक्रम संबंधित विभागांनी/कार्यालयांनी यशस्वीरीत्या पार पाडावे. याबाबतच्या आवश्यकत्या सूचना संबंधित प्रशासकीय विभागांनी निर्गमित कराव्यात.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८१७१२१४१३१४४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BALASAHEB ISHWAR SAWANT

Digitally signed by BALASAHEB ISHWAR SAWANT
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=79FCECC76DD8693A7BFCEC682EE63EEE2EDAF06BA586AC71715D8E6BA4D62FBE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=327FE83917B9691D96F2C6AEB03B51A86A595CCAC9264923EA4CD090FFD03E83, cn=BALASAHEB ISHWAR SAWANT
Date: 2026.08.17 15:13:09 +05'30'

**(बाळासाहेब ईश्वर सावंत)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. सभापती, विधान परिषद, यांचे खाजगी सचिव विधान मंडळ, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधान मंडळ, मुंबई.
४. मा. उपसभापती, विधान परिषद, यांचे खाजगी सचिव विधान मंडळ, मुंबई.
५. मा. उपाध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधान मंडळ, मुंबई.

६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. उपमुख्यमंत्री, नगर विकास विभाग,यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. उपमुख्यमंत्री, उत्पादन शुल्क व अल्पसंख्याक विभाग, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा यांचे खाजगी सचिव, मुंबई.
१३. सर्व सन्माननीय संसद सदस्य व सर्व सन्माननीय विधान मंडळ सदस्य.
१४. मा. मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई.
१६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१८. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/सर्व आयुक्त, महानगर पालिका/सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत.
१९. व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव, मुंबई.
२०. सर्व क्षेत्रीय कार्यालय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२२. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
२४. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
२५. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६. निवड नस्ती, सां.का.४.